RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Associate Professor &Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 2000/-



Scanned by CamScanner

ISSN 2320-4494

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Volume. II, Issue III**
***Oct. to Dec..- 2018***

Editorial Officer
**Shraddha Enterprises**
Infront of Tahsil Office,
Near Nilkamal Hotel,
Nagar Road,
Beed -431 122
Contact : 9420655507
**E-mail :** prakashkale.kale@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chanceller Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Ashok Deshmane**
Head of Dept.Marathi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Asso.Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Appasaheb Humbe**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Ulhas Shinde**
Ex-Dean, Faculty of Engineering
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr. Fulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**REFERECS**

Dr. Shahaji Gaikwad
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

Dr.Vishwas Patil
Radha Nagari College,Radha Nagari, Dist. Kolhapur

Dr. Ganesh Adgaonkar
Dept. Of Commerce
Kalikadev College, Shirur (Ka)

Dr. R. V. Shikhare
Vice -Principal
R.B. Attal College Georai

Dr. Shivaji Yadhav
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

Dr. Laxmikant Shinde
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

Mr. Ramesh Ringne
Prof. Bapu Ghokshe
Mr. Shivaji Kakade
Dr. Shakur Shaikh Husain

Mr. Vinod Kirdak
Dr. Datta Tangalwad
Mr. Kalandar Pathan
Dr. Suhas Morale
Dr. Baliram Katare

Assit.Prof.Mohan Kalkute
Dr. Adgaonkar Ganesh
Dr. Santosh Chavan
Dr. Rajkumar Yallawad



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Digital villages, Digital Banking and cashless economy, need to reduce costs and increase efficiency improving digital maturity | Prof.Dr.Mrs. Patil Sujata Chandrakant | 6 |
| 2 | Communication Skills in English | Dr. Vaishali S. Rokade | 10 |
| 3 | अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि दलित व आदिवासी समाजाचे वास्तव | सतिश मारोतीराव देबडे | 14 |
| 4 | मानवाधिकार आणि आदिवासी समुदाय | प्रा. डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव | 19 |
| 5 | नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कार्य (इ.स.1897 ते 1945 ) | प्रा. डॉ. शिवाजी लक्ष्मण नागरगोज | 22 |
| 6 | महात्मा गांधीजींच्या आचारसरणीने भारत महासत्ता बनू शकतो.! | प्रा.मोहन काळकुटे | 24 |
| 7 | कामगार चळवळ व आव्हाने : एक चिकित्सक अभ्यास | प्रा.डॉ. काकासाहेब गंगाधर पोकळे | 27 |
| 8 | प्रसार माध्यमाद्वारे प्रदर्शित स्त्री | प्रा. इरलापल्ले पल्लवी भागवतराव | 30 |
| 9 | बालकांचा शारीरिक - मानसिक सृजनात्मक विकास | प्रा. डॉ. सौ. जोत्स्ना मुकुंद दखणे | 32 |
| 10 | मध्ययुगीन मराठी वाङ्मय आणि तौलनिक साहित्याभ्यास | प्रा. संदीप उल्हाळकर | 36 |
| 11 | ऊनपाऊस' मधील समाज वास्तव | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 41 |
| 12 | मराठी दलित कविता | प्रा.डॉ. शकुंतला एम.भारंबे | 45 |
| 13 | हुंडा प्रथेचे सामाजिक दुष्परिणाम | प्रा.डॉ. बानायत जी. एच. | 49 |
| 14 | निर्मल वर्मा के कहानियों में आधुनिक बोध | प्रा. डॉ. कलशेट्टी एम. के. | 53 |
| 15 | समकालीन राजनीतिक काव्य में सामाजिक चेतना | डॉ. संतोष रामचंद्र आडे | 56 |
| 16 | विद्रोह : स्वरुप, संकल्पना आणि परंपरा | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 63 |
| 17 | \|\| पहावा विठ्ठल बोलावा विठ्ठल \|\| असामान्य जीवनवेध: पदमश्री डॉ. विठ्ठलराव विखे पा. | प्रा. डॉ.रुद्राक्षे चंद्रकांत दशरथ | 72 |
| 18 | भारतातील आरोग्य प्रशासन -आव्हाने आणि उपाययोजना | प्रा.डॉ. देशमुख आर.के. | 76 |
| 19 | Theory of Structuralism and post structuralism including Deconstruction | Prof. M. C. Talware | 81 |
| 20 | समाजभान अभिव्यक्त करणारी पी. विठ्ठल यांची कविता | प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे | 83 |




Scanned by CamScanner

# विद्रोह : स्वरूप, संकल्पना आणि परंपरा

डॉ राजेश्वर दुडूकनाळे
संचालक, विद्यार्थी विकास विभाग
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

सत्य.असत्य, समता.विशमता, स्वातंत्र्य.गुलामी यांच्यातील लढाई प्रकाश आणि अंधार यांच्या लढाई इतकीच जुनी आहे. प्राचीन काळापासून समाजामध्ये सत्तासंघर्श चालू असलेला दिसून येतो. ह्या सत्तासंघर्शामधूनच समाजजीवनात विशमता, गुलामी निर्माण होते. स्वत:चे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी, स्वार्थासाठी समाजातील एक विशिश्ट वर्ग बहुसंख्य लोकांवर अन्याय.अत्याचार करीत असतो. या वर्गाकडूनच माणसाच्या मेंदूला गुलाम बनविण्यासाठी एक शोशणाधिश्ठित व्यवस्था निर्माण केली जाते. अशा व्यवस्थेचा भाग किंवा घटक असणारा माणूस एक तर 'शोधक' असतो नाही तर 'शोशित' असतो. शोधकांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेमध्ये बहुसंख्य माणसांचे बौद्धिक, भावनिक, धार्मिक, वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा अनेक पातळ्यांवर शोधण सुरू असते. अर्थातच, शोधित वर्ग जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मागासलेला असतो आणि शोधक वर्ग पुढारलेला, निर्ढावलेला, मुजोर बनलेला असतो. समाजजीवनातील या दोन वर्गामध्ये चालणारा संघर्श समाजाच्या अस्तित्वाइतकाच जुना आहे. ह्य संघर्शामध्ये, समाजजीवनाच्या इतिहासामध्ये 'विद्रोह' या मूल्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**विद्रोहाचा अर्थ**

विविध जीवनमूल्यांच्या संदर्भात विद्रोहाचा अर्थ व त्याचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे. समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुभाव, सौजन्य, सत्यनिश्ठा, सौंदर्य, विवेकनिश्ठा ही विविध प्रकारची जीवनमूल्ये मानवी जीवनाला उज्ज्वल भवि याकडे घेऊन जातात. ह्य मानवी जीवनाला उन्नत करणाऱ्या मूल्यांचे मूळ मात्र विद्रोहामध ये असते. या अर्थाने 'विद्रोह' हे एक 'महामूल्य' ठरते. आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये महात्मा फुले, राजर्शी शाहू महाराज, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'विद्रोहात्मक' जीवनसंघर्शातून समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता ही जीवनमूल्य विकसित झाली आहेत.

कोणत्याही समाजात आणि कोणत्याही काळामध्ये माणसासमोर जगण्याचे प्रमुख असे दोन मार्ग असतात. एक परंपरेने चालत आलेले जीवन सर्वांगाने स्वीकारणे, स्वत:च्या वाट्यला आलेले जीवन आपल्या दैवाचा भाग समजणे, हा होय. या मार्गामध्ये माणूस गुलामीलाही धर्म, संस्कृती समजतो. अशा प्रकारचे जीवन चाकोरीबद्ध, परंपरागत विचारावर आधारलेले असते. म्हणून या मार्गात संघर्शाचा संबंधच येत नाही. जीवनाचा दुसरा मार्ग यापेक्षा संघर्शमय, रोमांचकारी आहे. तो म्हणजे परंपरेने चालत आलेले जीवन सर्वांगाने जशास तसे न स्वीकारता त्या जीवनमार्गातील अन्यायकारक, शोधक गोश्टींना विरोध करणे आणि संपूर्ण मानवजातीला हितकारक ठरणाऱ्या चांगल्या गोटींचा स्वीकार करणे हा होय. ह्य मार्गाने जो माणूस, जो समाज प्रवास करण्याचा प्रयत्न करतो त्या माणसाची, समाजाची प्रगती होऊ शकते. जीवन मार्गाच्या या दुसऱ्या वाटेवर जाणीवपूर्वक टाकलेले पहिले पाऊल म्हणजे 'विद्रोहा'चे बीजारोपण होय. प्रचंड अशा काळोखाच्या विरुद्ध दिशेने पडलेला सूर्याचा पहिला किरण होय.

'विद्रोह' या शब्दाचा अर्थ शब्दकोशामध्ये 'अनिश्ट परंपरेविरुद्ध उठाव किंवा निशेध' असा दिला आहे.[१] 'विद्रोह' म्हणजे कशाचा तरी निशेध करणे किंवा एखादी गोश्ट नाकारणे असा सर्वसाधारण समज आहे. विद्रोहाच्या प्रक्रियेमध्ये नकार, निशेध असतो हे जरी खरे असले तरी केवळ नकार म्हणजे विद्रोह नव्हे! 'विद्रोहा'मध्ये नकाराबरोबरच स्वीकाराची प्रक्रियाही महत्त्वाची असते. अर्थातच, वाईटाचा नकार आणि चांगल्याचा स्वीकार हे



Scanned by CamScanner

'विद्रोहा'चे मुख्य सूत्र असते. विद्रोहाचा अर्थ सांगताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, "विद्रोह म्हणजे प्रस्थापितांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी वंचितांनी केलेले सर्वांगीण स्वातंत्र्ययुद्ध होय. विद्रोह म्हणजे आपल्या वासोच्छ्वासांवरची, आपल्या नाडीच्या ठोक्यांवरची, आपल्या स्वत्वावरची, किंबहुना आपल्या एकूण अस्तित्वावरचीच अनिश्ट बंधणे तोडणे, आपल्याला गुदमरवून टाकणारी दडपणे झुगारून देणे होय. असा विद्रोह करताना काहीसा कर्कश आवाज, काही मोडतोड, काही विध्वंस होणारच. पण एवढ्यावरून विद्रोह म्हणजे काही तरी अनिश्ट अशी केवळ नकारात्मक संकल्पना आहे, असे मात्र कोणी म्हणू नये."[२] यावरून विद्रोह केवळ नकारात्मक नसतो हे लक्षात येते. केवळ नकारातून नवी संस्कृती निर्माण होऊ शकत नाही, याचे भान ठेवूनच विद्रोहात्मक संघर्श चालू राहतो. 'विद्रोह' संकल्पनेच्या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "साधारणतः आपल्याला दिसते, की नैसर्गिक न्याय आणि व्यवस्था यांच्यामधल्या संघर्शाला आपणाला विद्रोह असे म्हणता येईल. कारण विद्रोह करायचा तो कशाशी करायचा किंवा कोणाशी करायचा हा महत्त्वाचा प्रश्न असतो. जी काही एक व्यवस्था निर्माण झालेली असते त्या व्यवस्थेशी हा विद्रोह केला जातो."[३] माणसाचे नैसर्गिक हक्क अधिकार ज्या व्यवस्थेमध्ये हिरावून घेतलेले असतात त्या व्यवस्थेच्या विरोधामध्ये विद्रोह करावा लागतो.

**द्रोह आणि विद्रोह :**

विद्रोहाचा अर्थ पाहत असताना 'द्रोह' या शब्दाचा अर्थही समजून घेणे आवश्यक आहे. सामान्यपणे 'विद्रोह' म्हणजे 'द्रोह' असा अर्थ समाजजीवनात घेतला जातो. परंतु 'द्रोह' आणि 'विद्रोह' या दोन्ही शब्दांचे अर्थ स्वतंत्र आहेत. शब्दकोशामध्ये 'द्रोह' या शब्दाचा अर्थ 'द्वेश, विश्वासघात' असा दिला आहे.[४] यावरून द्रोह करणे म्हणजे द्वेश, विश्वासघात करणे होय. तर विद्रोह म्हणजे अन्याय अत्याचाराच्या विरोधात बंड करणे होय. द्रोह आणि विद्रोह या दोन शब्दातील उच्चारसाम्यामुळे 'विद्रोह' या शब्दाचा अर्थ चुकीचा घेण्याची शक्यता असते. द्रोह हा पूर्णपणे वेगळ्या अर्थाचा शब्द आहे. त्याचा 'विद्रोह' या शब्दाशी अर्थाच्या दृश्टीने कोणताही संबंध नाही. विद्रोहाच्या संस्कृतीमध्ये द्वेश, विश्वासघात बसत नाही. माणसा.माणसामध्ये जिव्हाळ्याचे, प्रेमाचे संबंध निर्माण करणे, मानवतावादी मूल्ये रुजविणे, जात धर्म, पंथ, लिंग, भाशा, इत्यादींच्या पलीकडे जाऊन माणसा.माणसाचे केवळ 'माणूस' म्हणून अतूट नाते निर्माण करणे हे विद्रोही संस्कृतीचे अंतिम ध्येय आहे.

विद्रोहाची संकल्पना समजून घेत असताना शोधक आणि शोधित यांच्यातील संघर्शही विचारात घ्यावा लागतो. कारण या संघर्शातूनच विद्रोहाचा जन्म होत असतो. प्रत्येक काळात, प्रत्येक समाजव्यवस्थेत कोणाकडून सामान्य लोकांचे शोशण चालू असते. शोशित वर्ग गुलामी झुगारून देण्याचा जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा खऱ्या अर्थाने संघर्शाला सुरुवात होते. एका अर्थाने शोशितांचा संघर्श हा त्यांच्या हितासाठी जसा असतो तसा शोशकांना सुधारण्यासाठी, स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी दिलेली ती एक संधीही असते. या पार्श्वभूमीवर प्रा. रा. ग. जाधव यांचे मत उद्बोधक आहे. ते म्हणतात, "विद्रोहाच्या संकल्पनेच्या बुडाशी पीडक आणि पीडित यांचे द्वंद्व (डायलेक्टिक्स) असते. असे द्वंद्व असते याचा अर्थ, ते पीडक आणि पीडित या दोहोंना अंतिम विश्लेशणात परस्परपोशक ठरते. स्त्री आणि पुरुश यांचे द्वंद्व ज्याप्रमाणे मानवी जीवनात उभयतांना इश्ट व पोशक ठरते, त्याचप्रमाणे विद्रोह संकल्पनेतील पीडकद्वंद्व उभयतांना फलदायी ठरते."[५] यावरून विद्रोहाच्या संकल्पनेची अन्वर्थकता व व्यापकता लक्षात येते. प्रस्थापित समाजव्यवस्थेमध्ये सामान्यतः बहुसंख्य असणाऱ्या सामान्यजनांचे शोशण चालू असते. हे शोशण संख्येने कमी असलेल्या वर्गाकडूनही होऊ शकते. भारतीय समाजव्यवस्थेत तर अशाच प्रकारचे चित्र आढळून येते. म्हणून "सामान्यतः समाजातील बहुसंख्याकांचा वर्ग हा पीडकांचा वर्ग असतो आणि पीडित हे



Scanned by CamScanner

सामान्यत: अल्पसंख्य असतात."[६] हे प्रा. रा. ग. जाधव यांचे मत भारतीय समाजव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर मान्य होण्यासारखे नाही. कारण भारतामध्ये वैदिकांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था अस्तित्वात आणल्यानंतर वैदिकांकडून बहुसंख्य असणाऱ्या बहुजन समाजाचे शोशण झाले आहे. महाराश्ट्रातील समाजजीवनाच्या संदर्भात विचार केल्यास कुणबी, माळी, सुतार, लोहार, तेली, मांग, महार अशा अनेक जातीतील लोकांचे ब्राह्मण वर्गाकडून शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक शोशण झालेले दिसून येते. अर्थातच, शोशकांचा वर्ग हा संख्येच्या बळावर आपले वर्चस्व गाजवत नसतो. ज्ञानसत्ता आणि धर्मसत्ता स्वत:कडे ठेवून आपल्याला पोशक अशी समाजव्यवस्था शोशकवर्ग निर्माण करीत असतो.

व्यक्तीकडून किंवा समाजाकडून केला जाणारा विद्रोह हा एखाद्या विशिश्ट व्यक्तीच्या, जातीच्या, वर्णाच्या, धर्माच्या, किंवा वर्गाच्या विरोधात नसतो. प्रतिगामी प्रवत्तीच्या विरोधामध्ये हा विद्रोह चालू असतो. वाईट गोश्टींचा प्रतिकार जसा विद्रोहामध्ये असतो तसा स्वत्वाचा शोधही असतो. 'माणूस' म्हणून असणारे स्वत:चे अस्तित्व अधिकाधिक न्याय मूल्यांच्या आधारे विकसित करणे ही देखील विद्रोहाच्या मागची प्रेरणा असते. यासंदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "दलित लेखकांचा विद्रोह विशिश्ट व्यक्तींविरुद्ध वा विशिश्ट जमातीविरुद्ध नाही तर हा विद्रोह, ही बंडखोरी स्वत्व शोधासाठी आहे. प्रतिगामी प्रव त्ती आणि कालबाह्य जीवनादर्श यांच्याविरुद्ध हा विद्रोह सतत चालू राहणार."[७] समाजातील प्रस्थापित वर्गाचे आदर्श, विस्थापित वर्गाचे आदर्श होऊ शकत नाहीत. कारण शोशणाला पोशक असणारी आदर्शच शोशित वर्गावर लादली जातात. मग ती कालबाह्य असोत किंवा विकृत असोत, असे आदर्श प्रस्थापितांच्या व्यवस्थेला बळकटी आणण्याचे काम करतात. अशा आदर्शांना मोडीत काढण्याचे काम विद्रोह करणाऱ्या व्यक्तीला किंवा समूहाला करावे लागते. एकूणच, विद्रोह हा जात, पंथ, धर्म, लिंग, वर्णाच्या भिंती ओलांडून विशाल अशा मानवतावादाच्या प्रदेशात प्रवेश करणारा असतो.

**'विद्रोह' संकल्पनेचा उदय आणि विकास :**

जगाच्या पाठीवर उद्योगाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे मानवाच्या आधुनिक जीवनाला सुरुवात झाली. शिक्षणाच्या, विज्ञान.तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सामाजिक.धार्मिक आणि सांस्कृतिक संघर्शाला नवी वळणे प्राप्त झाली. यातूनच पाश्चात्त्य देशांमध्ये अठराव्या शतकात 'विद्रोहा'च्या संकल्पनेचा जन्म झाला. या संदर्भात प्रा. रा. ग. जाध व म्हणतात, "विद्रोहाची संकल्पना आधुनिक आहे. पश्चिमी देशांत अठराव्या शतकापासून म्हणजे औद्योगिक समाजाच्या उदयानंतरच 'प्रोटेस्ट'ची किंवा निशेधाची वा विद्रोहाची संकल्पना प्रचलित झाल्याचे दिसते. हे विसावे शतक तर विद्रोहाचेच शतक मानले जाते. अमेरिकेतील निग्रो समाज, ऱ्होडेशियातील आफ्रिकी समाज, ऑस्ट्रेलियातील आदिवासी समाज आणि भारतातील आजवर अस्पृश्य मानला गेलेला समाज हे सर्व विद्रोही विचारप्रणालीने पेटलेले समाज आहेत."[८] अर्थात, आधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवरच हे मत लक्षात घ्यावे लागते. आधुनिक भारतीय समाजामध्ये इंग्रजी साम्राज्याच्या आगमनानंतर अनेक क्षेत्रात परिवर्तनं होऊ लागली. इंग्रजी शिक्षणाच्या संपर्कामुळे भारतीय समाजमनाला एक नवे भान आले. नवी दश्टी आली. याचा परिणाम म्हणून एकोणिसाव्या ातकात समाजप्रबोधनाला प्रारंभ झाला. शिक्षणाच्या प्रचार. प्रसारामुळे आणि समाजसुधारकांच्या प्रबोधनात्मक कार्यामुळे विद्रोही चळवळीला पोशक असणारे वातावरण निर्माण झाले. म. जोतीराव फुले, राजर्शी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कृतीतून भारतीय समाजाला एक नवे आत्मभान आले. अर्थातच, या महापुरुशांच्या कार्यातूनच आधुनिक भारताच्या इतिहासात 'विद्रोही' चळवळीचा, 'विद्रोह' संकल्पनेचा विकास झालेला दिसून येतो.



Scanned by CamScanner

**विद्रोहाची परंपरा :**

भारतीय समाजाच्या आणि इतिहासाच्या परिप्रेक्ष्यातून विद्रोही परंपरेचा शोध घेत असताना सिंधू संस्कृती, आर्यांचे आक्रमण आणि त्यानंतर हजारो वर्ष चालू असलेला सामाजिक आणि सांस्कृतिक संघर्श विचारात घ्यावा लागतो. वैदिकांनी समतावादी, कृशीप्रधान आणि मातृसत्ताक सिंधू संस्कृती उद्ध्वस्त केल्यानंतर भारतामध्ये नंतरच्या काळात वैदिकांच्या विरोधात अनेकवेळा मूलनिवासी भारतीयांनी बंडखोरी केली आहे. अर्थातच, भारतातील बहुजन समाजाला हजारो वर्शांचा सांस्कृतिक संघर्शाचा इतिहास आहे. या इतिहासामध्ये बळीराजा, चार्वाक, वर्धमान महावीर, गौतम बुद्ध, सम्राट अशोक या महापुरुशांचे खूप मोठे योगदान आहे. बहुजन समाजातील महापुरुशांनी विशमतावादी वैदिक संस्कृतीच्या विरोधामध्ये काळाच्या अनेक टप्प्यांवर केलेला संघर्श म्हणजे विद्रोहच होय. ही विद्रोहाची परंपरा आणि त्यातून निर्माण झालेले समाजवास्तव समजून घेतल्याशिवाय वर्तमानकालीन भारतीय समाज समजणे अवघड आहे.

सिंधू संस्कृतीतील वैदिकांच्या आक्रमणाबद्दल डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, “आर्यांनी सिंधुसंस्कृतीचा पाडाव केला. पुढे देव, असुर वगैरे जनसमूहांमध्ये संघर्श होता होता समन्वयही होऊ लागले. पण आपल्या देशात विविध जनसमूहांमध्ये खऱ्या अर्थाने समन्वय करण्याचे प्रामाणिक प्रयत्न वैदिकांकडून कधीच झाले नाहीत.”[९] या वैदिक संस्कृतीच्या विरोधामध्ये प्रारंभीच्या काळामध्ये अनेक छोटेमोठे विद्रोह झालेले दिसून येतात. या बाबतीत डॉ. आ. ह. साळुंखे लिहितात, “प्रारंभीचे काही विद्रोह अशा रीतीने फसलेले असले, तरी बहुजन समाजातील लोकांमध्ये स्वातंत्र्याच्या उर्मी पुन: पुन्हा उठतच होत्या. चार्वाक दर्शन हा वैदिक संस्कृतीवर झालेला एक घणाघाती हल्ला होता. तसे पाहिले, तर प्रल्हाद, विरोचन वगैरेंनी सिंधू संस्कृतीच्या काळातच या दर्शनाची बीजे पेरली होती. पुढच्या काळात या दर्शनाच्या अनुयायांनी वैदिकशोशणव्यवस्थेला प्रखर विरोध केला. चार्वाकांनी बौद्धिकदृश्टया वैदिकांना अक्षरश: निरुत्तर करून टाकले. परंतु चार्वाक हे बहुजन समाजाच्या हिताचे तत्त्वज्ञान असूनही बहुजन समाजाला ते भावले नाही. बहुजन समाज वैदिक व्यवस्थेलाच जपत राहिला आणि चार्वाकांना त्याने धिक्कारले.”[१०] या विवेचनावरून प्राचीन काळातील सामाजिक संघ र्शाचे, विद्रोहाचे स्वरूप लक्षात येते.

प्राचीन भारताच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये बळीवंशाच्या आणि बळीराजाच्या संघर्शाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. बळीराजाबरोबरच बळीराजाच्या पूर्वजांनी वैदिक व्यवस्थेच्या विरोधात केलेला संघर्श अतिशय महत्त्वाचा आहे. यामुळे हजारो वर्शानंतरही बळीराजा भारतीयांच्या स्मरणात आहे. वैदिकांच्या विशमतेला, विकृतीला आपल्या विवेकाने उत्तर देणारा, प्रसंगी प्राणावर उदार होणारा बळीवंश अपूर्वच म्हणायला हवा. ‘बळीवंश’ या संशोधनात्मक ग्रंथामध्ये डॉ. आ. ह. साळुंखे यांनी बळीवंशाच्या संघ र्शाबद्दल केलेले विवेचन अत्यंत अर्थपूर्ण आणि विद्रोहाची परंपरा समजून घेण्याच्या दश्टीने महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, “बळीवंशातील सर्वच राजे या बाबतीत फार फार वेगळे होते. स्वकीय जनांच्या सुखासाठी शत्रूंशी झगडताना आपल्या प्राणांसह आपले सर्वस्व लुबाडले,ओरबडले गेले तरी त्याची पर्वा करायची नाही, ही त्यांच्या जगण्याचीही आणि मरण्याचीही रीत होती. त्यांना सत्ता नको होती असे नाही, परंतु आपली सत्ता विशि ट तत्त्वज्ञानावर, नीतिमूल्यांवर, जीवनदर्शनावर उभी असली पाहिजे, याची पुरेपूर काळजी ते घेत होते. त्यांनी आपल्या हाताने आपल्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा विसर्जित केल्या असत्या आणि आक्रमक आर्य आपल्यापेक्षा वरचढ होत आहेत म्हटल्यावर त्यांच्यापुढे रणागती पत्करली असती, तर त्यांच्या इतक्या पिढ्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते. त्यांनी स्वत:च वैदिकांच्या रंगात रंगून जायचे ठरविले असते, तर आर्यांचे मांडलिक म्हणून ते सुखेनैव जगू कले असते आणि त्यांनी टाकलेल्या सत्तेच्या छोट्यामोठ्या तुकड्यांवर

पोट भरण्यासाठी लाळ घोटत सुखी राहू  िकले असते. परंतु त्यांच्यापैकी कोणीही आत्मद्रोहाचा हा मार्ग पत्करला नाही. त्यांच्या सैन्यातील व प्रजेतील काही व्यक्तींनी वा गटांनी गद्दारीचा मार्ग स्वीकारला, हे खरे आहे. परंतु हिरण्याक्षापासून बाणापर्यंत कोणीही आपल्या जीवनमूल्यांपेक्षा आपल्या प्राणांना अधिक महत्त्व दिले नाही, मग त्यांच्याकडून जीवनमूल्यांपेक्षा सत्तेला अधिक महत्त्व दिले जाण्याची  क्यता तर फार दूरची झाली. अगदी जीवघेण्या संघ  ांतिही त्यांची हृदये स्वच्छ आणि मस्तके ताठ राहिली. त्यांच्या पद्धतीने जगणे हे तर खरे जगणे आहेच, पण त्यांच्या पद्धतीने मरणे हे देखील जीवनाचा झेंडा उंच उंच फडकविण्यासारखे आहे!"[११] बळीवंशाने जीवनमूल्यांच्या रक्षणासाठी केलेला हा संघ  र्ष विद्रोहात्मक जाणिवाच प्रकट करणारा आहे.

**संत तुकाराम :**

"सत्य असत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता ।।" ही संत तुकारामांची घो  णाच मानवी जीवनाला उन्नत करणाऱ्या विवेकवादाला, विवेकनि  ठेला साद घालणारी आहे. "शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ।।"[१३] असे वर्ण अहंकाराचे विसर्जन करण्याचा संदेश देणारे संत तुकाराम म्हणजे महारा  ट्राच्या इतिहासातील एक बंडखोर व्यक्तिमत्त्व होय. सतराव्या  तकामध्ये त्यांनी इंद्रायणीमध्ये कर्जखते बुडवून स्वत:च्या सावकारीचे विसर्जन केले. त्यानंतरच त्यांना सामान्य माणसावर होणाऱ्या अन्याय.अत्याचाराच्या विरोधात बोलण्याचा, लिहिण्याचा नैतिक अधिकार प्राप्त झाला. "बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले" असे त्यांनी स्वत:च म्हटले आहे. ही स्वत:ची उक्ती त्यांनी स्वत:च्याच आचरणातून सार्थ करून दाखविली.

संत तुकारामांच्या अभंगवाणीवर मोठ्या प्रमाणात समीक्षणात्मक लेखन प्रकाशित झाले आहे. मानवी जीवनाला उन्नत करण्यासाठी आवश्यक असणारी जीवनमूल्ये संत तुकारामांनी अत्यंत तळमळीने आपल्या अभंगवाणीतून पुरविली आहेत. त्यांच्या अनेक अभंगातून विद्रोही जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. संत तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल 'विद्रोही तुकाराम' या ग्रंथातील 'सिंहाचे चित्रण  ेळीच्या स्वरूपात' या पहिल्या प्रकरणाच्या प्रारंभी डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, "तुकाराम! मानवी जीवनातील नाना प्रकारच्या उत्कट अनुभवांना अत्यंत आशयघन  ब्दांत साकार करणारा एक  ब्दार्थप्रभू प्रतिभावंत. धर्माला नीतीचे आणि नि  कपट भावनेचे अधि  ठान देणारा एक आचारशील भक्त. अक्षरश: सर्वस्व पणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात दंड थोपटणारा एक आव्हानवीर योद्धा. प्रतिभावंत, भक्त आणि योद्धा या तिन्ही भूमिकांचा एकत्र मिलाफ झालेला महापुरु  ा कवी तुकाराम, संत तुकाराम, विद्रोही तुकाराम!"[१४] मानवी जीवनाच्या संदर्भात आणि समाजवास्तवाच्या संदर्भात संत तुकारामांनी आपल्या अभंगातून व्यक्त केलेले चिंतन म्हणजे विद्रोही जाणिवांचा उत्कट आवि  कारच होय. विद्रोही विचारधारेला अधिकाधिक उंचीवर नेणारे सांस्कृतिक संचित म्हणजे त्यांची ही अभंगवाणी होय.

प्राचीन काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक संघ  ांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक काळातील विद्रोहाचे स्वरूप लक्षात घेता येते. महारा  ट्राला विद्रोहाची थोर परंपरा आहे. महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महारा  ट्राच्या इतिहासातील पहिले बंडखोर महापुरु  ा होत. वैदिकांच्या साहित्याची, धर्माची आधुनिक काळात प्रथमच महात्मा फुल्यांनी चिकित्सा करून बंड पुकारले. विचार आणि कृती यात कमालीचे साम्य असणारा आधुनिक भारताचा शिल्पकार म्हणजे म. फुले यांचे व्यक्तिमत्त्व होय. महात्मा फुले यांच्या बंडखोरीबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "भारतातील परंपरागत समाजसंस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले पुरु  ा म्हणजे जोतीबा फुले होत. अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली? भारतातील परंपरावादी समाजसंस्थांची व या समाजसंस्थांच्या नियमधर्माची पकड हजारो व  र्ं येथील जनमनांत पक्की बसलेली होती. या ठिकाणी सामाजिक



Scanned by CamScanner

जन्मसिद्ध उच्चनीच भाव हे ईश्वरी संकेताने व माणसांच्या पूर्वकर्माने निर्माण झालेले आहेत, म्हणून यांच्या विरुद्ध प्रयत्न करणे, हे महापाप आहे अशी समजूत होती. या महापापाची म्हणजेच अपवित्रतेची भीती येथील जनमानसात कायम घर करून बसली होती. ही खोलपणे सहस्त्रावधी व र्षे रुजलेली भीती घालविणारी जबरदस्त प्रेरणा जोतीबा फुले यांना कुठून मिळाली?"[१५] मूळातच फुले हे मानवी जीवनाचा वस्तुनि ष्ठ, मूलगामी विचार करणारे तत्त्वचिंतक होते. त्यांच्यातील हा तत्त्वचिंतकच विद्रोहाला जन्म देतो.

महात्मा फुले यांनी व्यापक समाजहित समोर ठेवून समाजप्रबोधनासाठी आणि नवसमाजनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. 'शेतकऱ्याचा असूड', 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म' या महत्त्वाच्या ग्रंथांबरोबरच त्यांची 'अखंड' रचनाही शो षकांच्या व्यवस्थेवर जबरदस्त प्रहार करणारी आहे.

फुल्यांचे अखंड म्हणजे विद्रोहाचा अग्नीच होत. समाजातील पाखंडीपणावर, दांभिकतेवर प्रहार करताना फुल्यांची भा षा अधिक आक्रमक होते. परंतु या आक्रमक भा षेच्या पाठीमागे मानवतावादाचा सुगंध दडलेला आहे. सत्य हाच धर्म मानणारे महात्मा फुले मनाने खूप संवेदनशील आहेत. त्यांच्या हृदयात मानवजातीबद्दल प्रचंड करुणा आहे. याचा प्रत्यय त्यांच्या पुढील अखंडातून येतो.

"ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी ।।
धरावे पोटाशीं ।। बंधूपरी ।।
मानव भावंडे सर्व एकसहा ।।
त्याजमध्यें आहां । तुम्ही सर्व ।।''[१६]

महात्मा फुले यांनी आपल्या लेखनातून अनेक ठिकाणी ब्राह्मणांवर अत्यंत कठोर श ब्दात प्रहार केले आहेत. शो षकांचा वर्ग म्हणून त्यांचा धिक्कार केला आहे. ब्राह्मण 'शो षक' म्हणून फुल्यांना अमान्य आहे. तो 'माणूस' म्हणून किंबहुना भाऊ म्हणून मान्य आहे. याबाबतीत डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, "फुल्यांनी एकीकडे ब्राह्मणांवर अत्यंत कठोर टीका केली आहे, परंतु दुसरीकडे मानव भावंडांमध्ये त्यांचा अंतर्भाव करून भावाप्रमाणे त्यांना पोटाशी कवटाळण्याची भा षा केली आहे. ब्राह्मण शो षक म्हणून नको असले, तरी भाऊ म्हणून हवे आहेत, असा याचा अर्थ होतो."[१७] या विवेचनावरून फुल्यांची माणूसपणावर असलेली नि ष्ठाच अधोरेखित होते. एकूणच, फुल्यांच्या विद्रोहात्मक समाजसंघ र्षामध्ये नकारात्मक जाणिवांबरोबरच उदात्त मानवी मूल्यांच्या स्वीकाराचा भाग फार महत्त्वाचा आहे. या जीवनमूल्यांच्या गर्भातून आधुनिक काळातील लोकशाहीचे सर्जन झाले आहे.

स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांवर महात्मा फुले यांची अपार नि ष्ठा होती. प्रत्यक्ष जीवनात या मूल्यांना प्रमाण मानून जगणारा, 'बोले तैसा चाले' ही उक्ती सार्थ करणारा महापुरु ष म्हणजे महात्मा फुले! फुल्यांच्या मृ त्युनंतर त्यांचे 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक प्रकाशित झाले. त्यांच्या संपूर्ण साहित्यामध्ये, विद्रोहात्मक जीवनप्रवासामध्ये या ग्रंथाला आगळेवेगळे स्थान आहे. हे फुल्यांचे लेखन म्हणजे मानवतावादी तत्त्वज्ञानाचे अत्युच्च शिखर आहे. या ग्रंथाबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "जोतीबांच्या विश्व कुटुंबवादाचा ''सार्वजनिक सत्यधर्म'' हा जाहीरनामा आहे. भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे विशद करून सांगणारा तो जाहीरनामा आहे. "[१८] मानव्याला अधिकाधिक उंचावर नेणारी तत्त्वे या ग्रंथात दिसून येतात. लोकशाही समाजव्यवस्थेला आवश्यक असणारी उर्जा म्हणजे 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ होय. मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणून या ग्रंथाची आधुनिक भारताच्या इतिहासात ओळख आहे. महात्मा फुले यांच्या या सामाजिक कार्याचे मोल ओळखूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आपल्या गुरूस्थानी मानले. सामाजिक लोकशाहीच्या पायाभरणीसाठी फुले यांनी केलेले कार्य अतिशय मोलाचे आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर फुल्यांचा गौरव



Scanned by CamScanner

करताना म्हणतात, "म. ज्योतिबा फुले हे आधुनिक युगातील सर्वात मोठे ूद्र होत. त्यांनी हिंदूतील खालच्या थरातील वर्गांना वरि ठांनी लादलेल्या गुलामगिरीसंबंधी जाग त केले. परकीय साम्राज्यापासून स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षा भारताला प्रथम सामाजिक लोकशाहीची आत्यंतिक आवश्यकता आहे या फार मोठ्या तत्त्वाची शिकवण त्यांनी दिली."[१९] महात्मा फुल्यांनी केलेले बंड अशा प्रकारे सामाजिक लोकशाहीला जन्म देते. भारतीय समाजाला नवी दिशा देते. म्हणून फुले हे आधुनिक भारताच्या इतिहासातील पहिले समाजक्रांतिकारक होत. त्यामुळे विद्रोहाची परंपरा मांडताना फुल्यांच्या सामाजिक आंदोलनाला समजून घेणे आवश्यक आहे.

**राजर्शी शाहू महाराज :**

महात्मा फुले नंतर राज र्षी ाहू महाराजांनी हा विद्रोहाचा झेंडा आपल्या खांद्यावर घेऊन पुढे फडकवत ठेवला. समाजातील अस्पृश्यता आणि वि मता संपविण्यासाठी ाहू महाराजांनी जीवघेणा संघ र्ष केला. अनेक मोठ्या संकटांवर मात करून त्यांनी समतेचा ध्वज फडकवत ठेवला. यामुळेच बहुजन समाजाला जीवनाच्या रणांगणावर संघ र्षाची मशाल घेऊन उतरता आले. नवी स्वप्ने पाहता आली. नवी आव्हाने स्वीकारून जीवनाला सामोरे जाता आले.

वर्णव्यवस्था, जातिभेद, अस्प श्यता यावर ाहू महाराजांनी कठोर ब्दात प्रहार केले आहेत. १५ एप्रिल १९२० रोजी नाशिक येथे श्री उदाजीराव मराठा विद्यार्थी वसतिग हाच्या इमारतीच्या पायाभरणीसाठी गेले होते. याठिकाणी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ाहू महाराज म्हणतात, "जातिद्वे ा हा हिंदुस्थानचा फार पुराणा रोग आहे. परशुरामाने नि:क्षत्रिय प थ्वी केली, या म्हणण्यात जातिद्वे ाचे प्रतिबिंब पूर्णपणे पडलेले दिसेल. पेशव्यांनी ब्राह्मणेतरांच्या घरावर गाढवाचे नांगर फिरविले, याचेही कारण तेच. त्यांच्या ेंड्या व जानवी श्री शिवाजी महाराज व मराठे वीर यांनी रक्षण केली तेच ब्राह्मण, मराठे ूद्र आहेत असे बिनदिक्कत प्रतिपादन करतात, याचे कारण दुसरे कोणते? या जातिद्वे ाची उचलबांगडी करावयाची असेल तर जातिभेदच मोडला पाहिजे. जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊया."[२०] वर्णव्यवस्थेमुळे आणि जातिव्यवस्थेमुळे भारताचे जेवढे नुकसान झाले तेवढे इतर कोणत्याही कारणाने झाले नाही. हजारो व र्षे भारतीय समाज वर्णाच्या, जातीच्या भिंतीमध्ये अडकून राहिला. परिणामी बाहेरच्या जगाकडे त्याला उघड्या डोळ्यांनी पाहता आले नाही. आपल्या वाट्याला आलेली दीनता म्हणजे ईश्वरी संकेत होय, पूर्वजन्मीच्या कर्माचे फळ होय असेच तो समजत राहिला. परिणामी भारतीय माणूस सर्वच क्षेत्रात जगाच्या तुलनेत मागे पडला. या सर्व गो टींना कारणीभूत असणारा जातिभेद आपण मोडून काढला पाहिजे असा बंडखोर विचार प्रस्तुत भा णातून ाहू महाराज मांडतात. यातून त्यांचे पुरोगामीत्व लक्षात येते.

अशा विद्रोही लोकराजाचा म त्यू झाल्यानंतर प्रबोधनकार के. सी. ठाकरे आपल्या 'प्रबोधन' नावाच्या नियतकालिकातील 'सर्चलाईट विझला' या लेखात म्हणतात, "शाहू महाराजांच्या म त्यूने एक पट्टीचा राजकारणी मुत्सद्दी, खंबीर समाजसुधारक, धैर्यवान, धर्मक्रांतिकार, सक्रिय अस्प श्योद्धारक, जगप्रसिद्ध पहिलवान, निधड्या छातीचा शिकारी, रा ट्रीय पक्षाच्या कारस्थानी मार्गातला कांटा आणि दीनदुनियेच्या भवितव्यतेवर प्रकाश पाडणारा सर्चलाईट नाहीसा झाला, असेच म्हटले पाहिजे."[२३] ही सर्चलाईटची उर्जा पुढे आंबेडकरांच्या रूपाने सूर्याचे रूप ध ारण करताना दिसते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

डॉ. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे विद्रोही जाणिवांचा उत्कट आवि कारच! हजारो व र्षांपासून ज्यांचे माणूसपण नाकारण्यात आले, ज्यांना स्वातंत्र्यापासून, हक्क.अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले अशा ो ितांना न्याय देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी हा संघ र्ष केला. "गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून

उठेल." हे डॉ. आंबेडकरांचे विधान म्हणजे गुलामीच्या अंधाराला, व्यवस्थेला उद्ध्वस्त करणारे क्षेपणास्त्रच होय. डॉ. आंबेडकरांच्या या संघ ातूनच ोि ात माणसाला जगण्याचे बळ मिळाले. जीवनाचा नवा मार्ग सापडला. म्हणून डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा एक विजेचा कल्लोळच. त्यांचे जीवन म्हणजे दीप्तीमान प्रकाश. अखंड स्रवणारा. मूकांना वाचा देणारा. पांगळ्यांना पर्वत चढण्याचे सामर्थ्य देणारा. सामर्थ्यहीनांना सामर्थ्याचे भक्कम बाहू देणारा. इच्छाशक्तींचा अंगार उसळविणारा. दलितांनी ासनकर्ती जमात व्हावी म्हणून अहर्निश झटणारा. 'फेकून दिलेला भाकरीचा तुकडा आम्हाला नको, आम्हाला हवे स्वाभिमानाचे जिणे' असे तडफेने सांगणारा हा झंझावात, दलितांच्या जीवनाला झपाटून टाकण्यासाठी आला."[२४] ोि ात वर्गाला अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी डॉ. आंबेडकर नेहमी प्रेरणा देत असत. अस्पृश्यांना दिलेल्या एका संदेशामध्ये ते म्हणतात, "ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्यांचा उद्धार करणे आपले कर्तव्य आहे अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होत. गुलामगिरीवर हल्ला चढविण्यासाठी जे आपले तन, मन, धन आणि तारुण्य कुरबान करतात ते धन्य होत! आणि अस्पृश्यांना आपली माणुसकी पूर्णपणे मिळेपर्यंत जे बऱ्याची.वाईटाची, सुखाची.दु:खाची, संकटाची.वादळाची, मानाची.अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगडत राहतील ते धन्य होत."[२५] अशा संदेशामुळेच ोि ात वर्गाला आत्मभान आले.

"हिंदू म्हणून जन्माला आलो; तरी हिंदू म्हणून मरणार नाही" ही घो णा डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला खरी करून दाखविली. वि मतेवर, ो णावर आधारलेल्या वैदिक धर्माला म्हणजेच हिंदू धर्माला नाकारून समताप्रिय, विवेकवादी बौद्ध धर्माचा जाहीरपणे स्वीकार केला. डॉ. आंबेडकरांचा हा नकार आणि स्वीकार म्हणजे भारताच्या सामाजिक, धार्मिक इतिहासातील मोठी क्रांतीच होती. या आंबेडकरांच्या विद्रोहाबद्दल डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, "चौदा ऑक्टोबर म्हणजे अंधाराला चिरत जाणारा प्रकाश. चौदा ऑक्टोबर म्हणजे नवे जीवनगाणे. चौदा ऑक्टोबर म्हणजे मानवतावादाने दिलेली हाक. नव्या निर्मितीचा उधाणक्षण म्हणजे चौदा ऑक्टोबर. या दिवसाची प्रतीक्षा करीत अस्पृश्यांच्या हजारो पिढ्या बर्बाद झाल्या.बेचिराख झाल्या."[२६] डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची ही कृती म्हणजे विकृतीचा धिक्कार आणि संस्कृतीचा स्वीकार होय. मानवतावादाचा आवि कार होय. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांवर आधारलेली लोकशाही प्रस्थापित करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनसंघ ाचे ध्येय होते. अर्थातच, डॉ. आंबेडकरांनी केलेल्या विद्रोहाचे मधूर फळ म्हणजे भारतीय राज्यघटना होय. लोकशाहीचा आधारस्तंभ असलेली राज्यघटना प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क देते. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करते. डॉ. आंबेडकरांनी आपल्या तवत्त्वज्ञानामध्ये 'स्वातंत्र्य' या मूल्याला खूप महत्त्व दिले आहे. या संदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, "लोकशाही समाजव्यवस्थेचा प्राणबिंदू म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यासाठी आयु यभर संघ केला. 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे सूत्र आमच्या हाती दिले."[२७] खरे तर माणसाच्या जीवनात स्वातंत्र्यापेक्षा श्रे ठ दुसरे काही असूच ाकत नाही. स्वातंत्र्य म्हणजे संपूर्ण मानव जातीला उन्नत करणारे मूल्य होय. या मूल्याला केंद्रबिंदू मानूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समृद्ध अशा लोकशाहीचा विचार भारतीयांना दिला.

विद्रोहाची परंपरा अधिकाधिक उन्नत होत आलेली आहे. महात्मा बळीराजा, चार्वाक, गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा, स्वामी चक्रधर, संत नामदेव, संत कबीर, संत तुकाराम, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, मह र्षी विठ्ठल रामजी शिंदे, राज र्षी ाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, डॉ. पंजाबराव देशमुख, रा ट्रसंत गाडगे महाराज, अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्याने ही विद्रोहाची परंपरा समृद्ध.संपन्न झाली आहे.



Scanned by CamScanner

संदर्भ सूची:
१. भावे ह. अ. (सं.). वरदा मराठी ाब्दकोश, वरदा प्रकाशन पुणे, दु. आ. २००२, पृ. ३४३.
२. साळुंखे आ. ह. . संवाद सहृदय श्रोत्यांशी, लोकायत प्रकाशन सातारा, प. आ. २००२, प . ११–१२.
३. तौर प थ्वीराज (सं.). साहित्य आणि विद्रोह, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प. आ. २००८, प .२६.
४. भावे ह. अ. (सं.). वरदा मराठी ाब्दकोश, उनि. पृ. २०१.
५. जाधव रा. ग. . निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन पुणे, चौ. आ. १९९५, प२३.
६. तत्रैव, प . २३
७. फडके भालचंद्र दलित साहित्य . वेदना अणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन पुणे, प.आ. १९७७, प . ७०.
८. जाधव रा. ग. . निळी पहाट, उनि. प . २२,२३.
९. साळुंखे आ. ह. . बळीवंश, लोकायत प्रकाशन सातारा, प. आ. २००५, प ३८५.
१०. तत्रैव, प . ३८६.
११. तत्रैव, प . १४६, १४७.
१२. साळुंखे आ. ह. . सर्वोत्तम भूमिपूत्र गोतम बुध्द, लोकायत प्रकाशन सातारा, प. आ. २००७, प . ५४५.
१३. जाधव रामदास (संयोजक). वै णव वेद (श्री संत तुकाराम महाराज अभंग गाथा), ांताई प्रकाशन पंढरपूर, अभंग ३०६२ पृ. ४४५.
१४. साळुंखे आ. ह. . विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन सातारा द्वि. आ. १९९९, प . ९.
१५. फडके य. दि. (सं.). महात्मा फुले समग्र वाङ्मय म. रा. सा. आणि सं. मंडळ मुंबई, चौ. आ. १९९१, प . १६.
१६. तत्रैव, प . ५३७
१७. साळुंखे आ. ह. . महात्मा फुले आणि धर्म, लोकवाङ्मय ग ह मुंबई, नऊवी आ. २००९ प . १७, १८.
१८. फडके य. दि. (सं.).महात्मा फुले समग्र वाङ्मय उनि. प . १७.
१९. खरात ंकरराव. अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे, द्वि. आ. २००४, प . ५.
२०. पवार जयसिंग (सं.). राज र्षी ाहू स्मारक ग्रंथ, महारा ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, प. आ. २००१, खंड तीन प . ८४७.
२१. तत्रैव, प . ८७३, ८७४.
२२. तत्रैव, खंड दुसरा, प . ३५४, ३५५.
२३. तत्रैव, खंड दुसरा, प . ७२२.
२४. पानतावणे गंगाधर. मूकनायक, निर्मल प्रकाशन नांदेड, चौ. आ. १९९८, प ५८,५९.
२५. कांबळे अरूण (सं.). जनता पत्रातील लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन पुणे, दु. आ. २००३. प . ४८.
२६. पानतावणे गंगाधर. मूकनायक, उनि. प . ११.
२७. वाघमारे जनार्दन. समाजपरिवर्तनाच्या दिशा, साकेत प्रकाशन औरंगाबाद, प. आ. १९९५, प . १०९.
२८. कांबळे अरूण (सं.).जनता पत्रातील लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उनि. प . ३४.

❑ ❑ ❑



Scanned by CamScanner